# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक – ४४०/२०२४** **दिनांक- २२/११/२०२४**

## प्रेस नोट

### " Credit card द्वारे ऑनलाईन झालेली १,०२,५२२/- रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश "

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नयानगर परीसरात राहणा-या श्रीमती. सिध्दीकी यांना नवीन क्रेडिट कार्ड प्राप्त झाले होते. तक्रारदार यांना अनोळखी मोबाईल धारकाने फोन करुन क्रेडिट कार्ड चालु करण्यासाठी मोबाईल पाठविलेल्या लिंकमध्ये क्रेडिट कार्डाची माहिती भरण्यास सांगितले. तक्रारदार यांनी माहिती भरली असता क्रेडिट कार्डाचे खात्यातुन रक्कम कपात झाल्याचा मॅसेज प्राप्त झाला. तक्रारदार यांनी सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्याने तात्काळ तक्रारी अर्जाची नोंद घेवुन ऑनलाईन **NCCRP Portal** क्र. **31911240162377** वर तक्रार नोंदविण्यात आली.

तक्रारदार यांची ऑनलाईन **NCCRP Portal** वर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम Razorpay या पेमेंट गेटवेच्या खात्यात वर्ग झाल्याने Razorpay सोबत पत्रव्यवहार करुन रक्कम थांबविण्यात आली. तक्रारदार यांची थांबविण्यात आलेली रक्कम परत मिळविण्याकरीता Razorpay सोबत पत्रव्यवहार करण्यात आले. अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी पत्रव्यवहार करुन पाठपुरावा केल्याने तक्रारदार यांची **फसवणुक झालेली १,०२,५२२/- रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.**

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **क्रेडीट कार्ड, डेबिट कार्डद्वारे फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**
- **अनोळखी लिंक प्राप्त झाल्यास त्या अनुषंगाने कोणतीही कारवाई करुन नये.**
- **मोबाईलमध्ये कोणतेही अनोळखी ॲप्लीकेशन डाऊनलोड करू नये, तसेच आपले मोबाईलमधील ॲप्लीकेशनची पडताळणी करावी.**
- **बँकेकडून बँक खातेधारकाला कोणतीही वैयक्तीक माहिती (KYC करीता) विचारली जात नाही.**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती देवू नये.**
- **फसव्या एमएसएसला,कॉल प्रतिसाद देवू नका.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउनि/प्रसाद शेनोळकर, सफौ/फर्नांडिस, पोअं/सावन शेवाळे, मसुब/प्रविण सावंत यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**
**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

**----0000----**